आदिवासी आणि शहरी महिला यांच्या स्थितीचा तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानवविद्याशाखेतील ‘समाजशास्त्र’ विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता सादर करण्यात येणारा संशोधन पूर्व आराखडा

संशोधक

सुप्रिया गणपतराव गडलवाड

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

प्रा. (डॉ.) माधव माणिकराव मोरे

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

नारायणराव वाघमारे महाविद्यालय, आखाडा बाळापूर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली.

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट 2023

आदिवासी आणि शहरी महिला यांच्या स्थितीचा तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

1. प्रस्तावना (Introduction): -

वर्षानुवर्ष पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीत स्त्रियांना आजही दुय्यम स्थान आहे. आज घडीला विज्ञान तंत्रज्ञानाने खूप प्रगती केली असली तरी स्त्रियांवर लादलेले बंधने पुरेसे बदलले नाही. जगाच्या प्रत्येक देशातील स्त्री ही मुख्य प्रवाहापासून वंचित आहे. स्त्रियांच्या प्रश्नांचे स्वरुप देशकाळ परत्वे वेगळे असले तरी स्त्रियांच्या समस्या नाहीत अशी कोठेही परिस्थिती नाही. स्त्रियांच्या वाट्याला आजही दुय्यम, कनिष्ठ आणि विषम जीवन येते. पुरुषप्रधान संस्कृतीत गुरफटलेल्या स्त्रियांनी स्वत:च्या अस्तित्त्वाचा शोध घेण्यास जेंव्हा सुरुवात केली तेंव्हा स्त्रियांच्या अस्तित्त्वाची, शक्तीची व सामर्थ्याची जाणीव झाली.

स्त्री समाजपरत्वे बदलणारी समाजाचा एक महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू आहे. सहनशीलता आणि मानसिकतेत स्त्रियांची विचारशक्ती ही बदल घडवून आणणारी एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. यात बदल घडवून आणण्याचा परिपाक म्हणजे त्यांचे सर्वगुण, सर्वव्यापक विकास घडवून आणणे होय. भारतीय समाजात पुरुषसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्त्वात असल्याकारणाने स्त्री ही नाजूक, साजूक, हळवी व आत्मविश्वासाचा अभाव असणारी एक उपभोग्य वस्तू आहे असे म्हटले जाते. या पुरुषसत्ताक कुटुंबपद्धतीत ‘चूल आणि मूल’ एवढेच तिचे कार्यक्षेत्र मर्यादित मानले जाते. त्याचबरोबर स्त्रियांच्या वाट्याला अदृश्य व अनार्थिक कार्य सोपविले जात

असल्याचे चित्र पहावयास मिळते. स्त्रीमुक्ती, स्त्री पुरुष समानता आणि स्त्रीशक्ती या संकल्पना एकविसाव्या शतकात बहुतांशी प्रमाणात रूजल्या आहेत. आदिवासी व शहरी भागात स्त्री संघटना, महिला आघाडी, स्त्री आधार केंद्र स्त्रियांच्या स्वंयसेवी संस्था, स्वंय सहायता समूह हे दिवसेंदिवस जागृत होत आहे.

प्राचीन काळापासून ते उत्तर आधुनिक काळापर्यंत आदिवासी आणि शहरी स्त्रियांचे स्वरुप, प्रश्न बऱ्याच प्रमाणात तफावतशीररित्या पहावयास मिळते. स्त्रियांची सामाजिक व शैक्षणिक स्थिती आज घडीला कोणता आलेख दर्शविते हे मतितार्थ उलघडवून दाखविण्याकरीता प्रस्तुत विषयाकडे लक्ष केंद्रीत केले आहे.

2. संदर्भ साहित्याचा आढावा (Review of Literature):

कुलकर्णी शौनक (2009-2010)

यांनी 'महाराष्ट्रातील आदिवासी' या शोधिनबंधात आदिवासींच्या पूर्ण जमातीवर थोडक्यात सामाजिक स्थितीची, वैवाहिक स्थितीचा आढावा घेतला आहे. आदिवासींचा धर्म, विवाह, कुटुंब व आप्तसंबंध, आदिवासींची अर्थव्यवस्था, आदिवासी स्त्रीचे जीवन यावर सुक्ष्मरित्या प्रकाश टाकला आहे. त्याचबरोबर आदिवासी स्त्रीच्या संदर्भात आदिवासी स्त्रियांचे अधिकार, कुटुंबातील होणारी त्यांची हेळसांड नैतिकता व अनैतिकासंदर्भात उहापोह करून एक आगळेवेगळे विचार प्रतिपादित केले आहेत.

परदेशी प्रतिमा व कांबळे सरोज (2007)

यांनी ‘जातिव्यवस्था व स्त्रीमुक्ती’ या शोधनिबंधात जातिव्यवस्थेतून स्त्रीची मुक्तता प्रकट केली आहे. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी जातिव्यवथेचे समूळ नष्टता करणे आवश्यक आहे. स्त्रीमुक्तीचा विचार केवळ उच्चवर्गीय जातीय स्त्रियांसाठी नसून, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, दलित, बहुजन अशा सर्वच स्त्रियांसाठी मुक्तदायी विचार प्रवाह आहे असे प्रतिपादीत केले आहे. भारतातील स्त्री वर्ग व्यवस्था आणि पुरुष वर्चस्व या दोन बेड्यात अडकून आहे. भारतातील स्त्रीला या दोन बेड्यांचे बंधन आहे. तिसरे बंधन म्हणजे जातिव्यवस्थेचे आहे. जातपंचायत, जातीय श्रमविभाजन, जातीवर आधारीत कुटुंब, कायदे स्त्रीला गुलामीत ठेवले जाते. विवाह, घटस्फोट, पुनःर्विवाह, वारसा हक्क आदी बाबतीत स्त्रीला पुरुषासंबंधी आणि पराधीन बनवण्यात हे जातीय कायदे व जातीय व्यवस्था भूमिका बजावतात. स्त्रीमुक्ती संघटनांनी म्हणूनच जातिव्यवस्था आणि स्त्रभ्दास्यावर प्रकाश टाकला आहे.

सोनाळकर वंदना (2006)

यांनी ‘स्त्री अध्ययनातील सद्यःकालीन दृष्टिकोन’ या शोधनिबंधात स्त्रियांच्या शिक्षणासंदर्भात व स्त्रियांची स्थिती याबाबतीत विचारमंथन केले आहे. स्त्रियांची स्थिती ही शिक्षणाच्या बाबतीत पुरुषांच्या तुलनेत अत्यल्प आहे. स्त्री ही जगाची अर्धी शक्ती आहे. तिला समाजाच्या विविध प्रवाहात आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादित केले आहे. स्त्रियांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी पुरुषी मानसिकता बदलणे अत्यंत आवश्यक आहे. पुरुषी दृष्टिकोनाची वर्चस्वता स्त्री

शिक्षणाला अडसर ठरत आहे. असा निष्कर्ष त्यांनी आपल्या प्रस्तुत शोधनिबंधात काढला आहे.

शिंदे ताराबाई (1882)

यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या संदर्भ ग्रंथात ताराबाई शिंदे यांनी स्त्री आणि पुरुषांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय स्थितीबाबतीत तुलना केली आहे. पुरुषी कुटुंबसत्ताक पद्धतीमुळे स्त्रियांचे सर्व अधिकार व स्वातंत्र्य हिरावून घेतले आहेत. स्त्री विचारधारेला कोठेच संधी नसल्याचे स्पष्ट केले आहे. पुरुषांना आर्थिक कार्य व स्त्रियांना अनार्थिक कामे, स्त्रियांना प्रत्येक क्षेत्रापासून वंचित ठेवल्याचे विचार प्रतिपादित केले आहेत. स्त्रीची पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत कुचंबना होते व व्यक्तिगत हिताला स्थान नाही असे विचार स्पष्ट केले आहे. स्त्री ही पडलेली वस्तू आहे. तिचे अस्तित्त्व हे समाजात फक्त पुरुषांची सेवा व अनेकविध गरजा भागविणे आहे. असा निष्कर्ष ही त्यांच्या संदर्भ ग्रंथातून निदर्शनास येतो.

रेगे शर्मिला (1999)

यांनी 'पितृसत्ताक व स्त्रीमुक्ती' या संदर्भ ग्रंथात स्त्रियांना नेहमीच समाजात गौण स्थान असल्याचे स्पष्ट केले आहे. स्त्री-पुरुष यांच्यातील सामाजिक भेद आणि स्त्रियांचे गौण स्थान यांची कारणे नैसर्गिक नसून ती सांस्कृतिक आहेत. पितृसत्ताक

कुटुंब पद्धती जातीव्यवस्था आणि स्त्रियांचे स्थान, स्त्रियांवरील होणारे सततचे अत्याचार, बलात्काराचा प्रश्न व कौटुंबिक हिंसा, आणि अमानवी क्रुर कार्य अशा विविध व अनेकविध प्रश्नांची वस्तुनिष्ठपणे मांडणी या संदर्भग्रंथात केली आहे. त्याचबरोबर लिंग आणि लिंगभाव यामधील फरक त्यांनी अधोरेखित केला आहे. लिंगभेद हा जैविक घटकांवर आधारित असतो, असा निष्कर्षही त्यांनी काढला आहे.

3. संशोधन विषयाची निवड (Selection of Research Topic):

भारतीय समाज हा दोन जैविक घटकांवर आधारीत आहे. या दोन जैविक घटकात महिला हा घटक महत्त्वपूर्ण मानला जातो. स्त्री ही जगाची अर्धी शक्ती आहे. परंतु महिलांना कमजोर, नाजूक, भावनात्मक आणि अक्षम असल्याचे पितृसत्ताक व्यवस्थेने निर्गमित केले आहे. पुरुषांच्या वर्चस्वाखाली कौटुंबिक व सामाजिक सर्व व्यवहार महिलांना करावे लागतात. आजही आदिवासी भागात महिलांना कौटुंबिक निर्णयापासून वंचित ठेवले जाते. समाजातील महिलांची प्रतिमा, कुटुंब, समाज, शासन आणि निमशासकीय संस्थांची शैक्षणिक स्थिती बदलत्या काळानुसार परिवर्तीत होणे महत्त्वाचे आहे.

पितृसत्ताक व्यवस्थेतील स्त्रियांनी स्वत:ला जगण्यासाठी सामाजिक व शैक्षणिक अडथळे दूर केल्याने त्यांची सामाजिक आणि समतोल स्थिती कालांतराने कशी सुधारेल यावर लक्ष केंद्रीत करणे महत्त्वाचे आहे. कारण परिवर्तन हा प्रकृतीचा, निसर्गाचा नियम आहे. बदलत्या परिस्थितीत महिलांचा दर्जा उंचावणे अत्यंत गरजेचे वाटते. विज्ञान-तंत्रज्ञान आणि आधुनिकीकरणाच्या

प्रक्रियेत आदिवासी व शहरी महिलांचे सामाजिक व शैक्षणिक शोषण विविध प्रश्नांची उकल करण्याकरीता आदिवासी महिलांचे जीवनस्तर, बोलीभाषा, खानपानविषयक नियम, पोशाख, केसरचना, संस्कृती, अलंकार, शिक्षण, वेशभूषा, अंधश्रद्धा, कौटुंबिक निर्णय, वैवाहिक प्रश्न, शहरी स्त्रियांच्या तुलनेत अभ्यासणे गरजेचे वाटते. या अनुषंगाने "**आदिवासी आणि शहरी महिला यांच्या स्थितीचा तुलनात्मक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा**" या विषयाची निवड करण्यात आली आहे.

4. संशोधन विषयाचे महत्त्व (Important of the Research Topic):

समाजशास्त्रीय संशोधनात कोणत्याही विषयांवर संशोधन करताना संशोधन विषयाचे महत्त्व सांगणे अपरिहार्य ठरते. संशोधन विषयाचे महत्त्व हे शोधप्रबंधात महत्त्वपूर्ण योगदान देत असते. या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

1. आदिवासी आणि शहरी महिलांची सद्य:स्थितीची वास्तविकता प्रकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.
2. आदिवासी आणि शहरी महिलातील अज्ञानता दूर करून त्यांचे जीवन स्तर उंचावण्यासाठी उपयोगी पडेल.
3. संशोधन विषयाच्या निष्कर्षाच्या आधारावर महिलाविषयी नवीन योजना, कायदे आणि महिला सशक्तीकरणासह महत्त्वपूर्ण ठरेल.
4. महिलांसाठी कौटुंबिक समस्या सोडविण्यास महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

5. प्रस्तुत संशोधन कार्य हे महिलांच्या अधिकाराविषयी जागृती करण्यासाठी महत्त्वाचे ठरेल.

5. संशोधन विषयाचे उद्दिष्ट्ये (Objective of the Research):

कोणतेही संशोधन कार्य करताना संशोधक काही उद्दिष्ट्ये निश्चित करतो. उद्दिष्ट्ये हे संशोधन विषयाचे हेतूपूर्ती करणारे असतात. या अनुषंगाने काही उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे निर्धारित केले आहेत.

1. आदिवासी आणि शहरी महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्य स्थितीतील सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.
2. आदिवासी व शहरी महिलांच्या विकासात महिला बचत गटाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
3. नवीन सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमामध्ये या महिलांच्या सहभागाचा आढावा घेणे.
4. आदिवासी आणि शहरी महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्य स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
5. आदिवासी आणि शहरी महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व आरोग्य समस्यांचा अभ्यास करणे.

6. संशोधन विषयाची गृहितकृत्ये (Hypothesis of Research Topic):

समाजशास्त्रीय संशोधनात गृहितकृत्ये हे संशोधनाला गती देण्याचे काम करतात. संशोधन कार्य करण्यापूर्वी जे विधान गृहित धरले जाते त्यास सर्वसाधारणपणे गृहितकृत्ये असे म्हणतात. संशोधनात गृहितकृत्ये हे द्विचल स्वरुपाचे मांडले जातात. या अनुषंगाने संशोधन विषयाचे गृहितकृत्ये पुढीलप्रमाणे मांडले आहेत.

1. शैक्षणिक सुविधांमुळे आदिवासी आणि शहरी महिलांच्या शिक्षणाचा दर्जा सुधारला आहे.
2. आदिवासी आणि शहरी महिलांच्या बचत गटातील सहभागामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक व आरोग्य स्थिती बदली आहे.
3. सामाजिक उपक्रमामुळे आदिवासी आणि शहरी महिलांच्या सामाजिक आर्थिक व आरोग्य जीवनावर परिणाम झाला आहे.
4. शहरी महिलांचा शिक्षणाचा स्तर आदिवासी महिलापेक्षा जास्त आहे.
5. आदिवासी आणि शहरी महिलांमध्ये विविध सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक समस्या आहेत.

7. संशोधन पद्धती (Research Method):

सामाजिकशास्त्रात कोणत्याही विषयावर सुक्ष्म संशोधन करीत असताना संशोधन पद्धतीचा अवलंब केला जातो. कोणत्याही एखाद्या विषयावर सुक्ष्म व सखोल अभ्यास करून निष्कर्ष समाजोपयोगी मांडणे म्हणजे संशोधन होय. याच

अनुषंगाने प्रस्तुत संशोधन विषयाकरीता पुढील संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाईल.

i) **संशोधन आराखडा** (Research Design):

संशोधन आराखड्यामध्ये कार्यप्रणालीचा एक विशिष्ट समूह असतो. ज्यात तथ्य संकलन व विश्लेषण सम्मिलित आहे. अध्ययनाचा निश्चित हेतूपूर्ती करण्याची क्षमताही असते. संशोधन आराखडा हेतूपूर्वक वापरला जातो. याच अनुषंगाने प्रस्तुत शोध प्रबंधाकरीता **वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा** अवलंब केला जाईल.

ii) **नमुना निवड पद्धत** (Sample Selection Method):

समाजशास्त्रीय ज्ञानशाखेत संशोधनाचा एक अविभाज्य भाग म्हणजे नमुना निवड पद्धतीचा उल्लेख केला जातो. नमुना निवड करत असताना अभ्यासाचे क्षेत्र व स्वरुप लक्षात घेऊन नमुना तंत्राची निवड केली जाते. नमुना निवड पद्धतीमुळे वेळ, श्रम, पैसा यांची बचत होते.

iii) **नमुना आकार** (Sample size):

प्रस्तुत संशोधन विषयाकरीता नमुना आकार म्हणून 200 एकक प्रातिनिधीक स्वरुपात निवड करण्यात येईल. 200 एकक निवडून नमुना आकार निश्चित केला जाईल.

iv) **नमुना निवडण्याची पद्धत** (Method of Selecting Sample):

नमुना आकार निश्चित केल्यानंतर समग्रातून एककांची निवड करताना संभाव्यता आणि गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धती या विचारात घ्यावे लागते. प्रस्तुत संशोधन क्षेत्रातील महिलांची निश्चित आकडेवारी उपलब्ध असल्या कारणाने संभाव्यता नमुना निवडीअंतर्गत कोटा नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जाईल.

v) **गुणात्मक व संख्यात्मक संशोधन पद्धत** (Qualitative and Quantity Research Method):

प्रस्तुत संशोधनात आवश्यकतेनुसार गुणात्मक व संख्यात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाईल. प्राथमिक व दुय्यम तथ्यांचे विश्लेषण हे निरिक्षण तंत्र, सहभागी निरीक्षण तंत्र, सुस्पष्टपणे विचारांची मांडणी केली जाईल.

vi) **तथ्य संकलन** (Data Collection):

संशोधन विषयासंबंधीत तथ्य संकलित केली जातात. तथ्य संकलन हे संशोधन कार्यातील एक महत्त्वाचे प्राथमिक कार्य आहे. तथ्य ही एक घटना आहे. तथ्य संकलनातील प्राथमिक, दुय्यम तंत्राचा अवलंब व **प्रस्तुत संशोधन कार्यासाठी मुलाखत अनुसूची** या तंत्राचा वापर करण्यात येईल.

8. **संदर्भ क्षेत्राची व्याप्ती आणि मर्यादा** (Research Area & Limitations):

संशोधनासाठी जो विषय निवडला त्याचे स्वरुप लक्षात घेऊन संशोधन संदर्भ क्षेत्राची व्याप्ती आणि मर्यादा निश्चित केली जाते. प्रस्तुत संशोधन कार्य हे नांदेड जिल्ह्यातील 16 तालुक्यापुरते मर्यादित राहील. तसेच आदिवासी जमातीतील आंध,

गोंड, भिल्ल, महादेव कोळी व अनुसूची जातीतील चांभार, सुतार, मातंग आणि बौद्ध या जातीतील महिलांपुरतेच मर्यादित राहील.

9. सैद्धांतिक दृष्टिकोन (Theoritical Perspective):

सामाजिक शास्त्रातील सुक्ष्म संशोधन करीत असताना समाजशास्त्रीय लिखाण प्रवाहात कोणत्या कोणत्या सैद्धांतिक दृष्टिकोनाचा आधार घेऊन संशोधन कार्य पूर्ण केले जाते. प्रस्तुत संशोधन कार्य हे **स्त्रीवादी सैद्धांतिक दृष्टिकोनाचा** आधार घेऊन पूर्ण केले जाईल.

10. अपेक्षित योगदान (Excepted Contributions):

नैसर्गिक व सामाजिक शास्त्रातील कोणत्याही विषयांचे संशोधन हे समाज उपयुक्त असणे अपरिहार्य आहे. संबंधित संशोधनामुळे समाजव्यवस्थेत अनुकूल परिणाम होत असतात. त्याच अनुषंगाने प्रस्तुत संशोधन हे महिला विषयक कायदे, अधिकार, जनजागृती, समस्यांवरील निराकरण, महिलांतील अज्ञानता दूर करण्यासाठी, कौटुंबिक व सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी उपयोगी पडणार आहे.

11. तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन (Data Analysis & Interpretations):

संशोधन विषयानुसार घटनेची पुन्हा-पुन्हा पडताळणी करुन नवीन तथ्यांचा शोध घेतला जातो. तथ्ये ही विखुरलेली असल्याकारणाने तथ्यांना योग्य क्रम देऊन तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल. त्यात संशोधन प्रक्रियेअंतर्गत सांकेतिकीकरण, वर्गीकरण, सारणीकरण, अनुमापन तंत्रे, SPSS (एसपीएसएस) प्रणालीचा वापर इ. घटकांचा वापर करुन अर्थनिर्वचन करण्यात येईल.

प्रकरण निहाय रचना (Chapter Plan):

प्रकरण पहिले – प्रस्तावना

प्रकरण दुसरे – संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे – संशोधन पद्धती

प्रकरण चौथे – तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे – सारांश, निष्कर्ष व सूचना

संदर्भग्रंथसूची :-

1. गारे गोविंद, (1997), “आदिवासी की शिक्षा”, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
2. जोशी नलिनी, (2002), “भारतीय महिला”, डायमंड प्रकाशन, पुणे.
3. संत दु.का., (2000), “भारतीय समाज में महिलाओं का स्थान”, हिमालया प्रकाशन, नागपूर
4. पाटील लीला, (1990), “भारतीय महिलांचे जीवन”, मेहता प्रकाशन, पुणे.
5. संगवे विलास, (1972), “आदिवासी सामाजिक जीवन”, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
6. तेगमपुरे मारोती, (2008), “आदिवासी विकास आणि वास्तव”, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
7. भागवत विद्युत, (2009), “स्त्रीवादी सामाजिक विचार”, डायमंड प्रकाशन, पुणे.
8. कुलकर्णी शौनक, (2009), “महाराष्ट्रातील आदिवासी”, डायमंड प्रकाशन, पुणे.
9. परदेशी प्रतिमा व इतर, (2007) (संपा.), “जातिव्यवस्था व स्त्रीमुक्ती”, प्रकाशक दिलीप चव्हाण, अहमदनगर.

10. सोनाळकर वंदना, (2006), स्त्री अध्ययनातील सद्य:कालीन दृष्टिकोन", प्रकाशक स्त्री अभ्यास केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

11. शिंदे ताराबाई, (1882), "स्त्री पुरुष तुलना", प्रकाशक सीमा साखरे, नागपूर.

12. रेगे शमिला, (1999), "पितृसत्ताक व स्त्रीमुक्ती", प्रकाशक दिलीप चव्हाण, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर.

13. तांबे अनघा,(2009) (संपा.),"स्त्रियांचे सामाजिक सक्षमीकरण", प्रकाशक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यासकेंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.

14. पाटील अरुंधती सूर्यकांत, (2012) (संपा.), "स्त्री: आत्मभान ते सबलीकरण एक प्रवास", अरुणा प्रकाशन, लातूर.

15. देशमुख किया, (2015), "महिला हिंसाचार व कायदेविषयक साक्षरता स्मरणिका", प्रकाशक के.आर.एम.महिला महाविद्यालय, नांदेङ

16. देशपांडे प्रकाश, (2017), "संशोधन पद्धती", ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

17. बोधनकर सुधीर व इतर, (2003), "सामाजिक संशोधन पद्धती", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

18. भांडारकर पु.ल., (1999), “सामाजिक संशोधन पद्धती”, विद्या बुक्स प्रकाशन, औरंगाबाद.

19. आगलावे प्रदिप, (2000), “सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे”, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

संशोधक मार्गदर्शक
प्रा. (डॉ.) माधव माणिकराव मोरे
समाजशास्त्र विभागप्रमुख,
नारायणराव वाघमारे महाविद्यालय,
आखाडा बाळापूर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली.

संशोधक
सुप्रिया गणपतराव गडलवाड
सामाजिकशास्त्रे संकुल
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड